**समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद पुणे.**
**यशवंतराव चव्हाण भवन, तिसरा मजला, १ वेलस्ली रोड, पुणे कॅम्प, पुणे ४११००१**
*e-mail id: zppunesw@yahoo.com* **दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१३ १७७४**

## पुणे जिल्हा परिषद फेलोशिप कार्यक्रम 2026-27
*(जिल्हा परिषद कौशल्य विकास योजना)*

**प्रस्तावना:**

जिल्हा परिषद पुणेच्या विकासकामांमध्ये गुणवंत व उत्साही युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी "जिल्हा परिषद पुणे फेलोशिप" हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या फेलोशिपद्वारे विविध क्षेत्रांतील तरुणांना जिल्हा परिषद प्रशासनासोबत प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळेल. त्यांच्या ज्ञानाचा, कौशल्यांचा आणि नाविन्यपूर्ण विचारांचा उपयोग शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास, डिजिटल प्रशासन, कृषी, पाणी व स्वच्छता अशा विविध क्षेत्रांतील उपक्रमांमध्ये केला जाईल.

या उपक्रमांतर्गत एकूण 50 फेलोंची निवड करण्यात येणार असून, त्यापैकी 25 फेलो हे समाज कल्याण विभागा मार्फत निवडले जातील जे अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST) व विमुक्त जाती-भटक्या जमाती (VJNT) प्रवर्गातून तसेच 25 फेलो ही सामान्य प्रशासन विभागा मार्फत निवडले जातील जे खुला (Open) व इतर मागासवर्गीय (OBC) प्रवर्गातून निवडले जातील. यामुळे समाजातील विविध घटकांतील गुणवंत युवकांना प्रशासन आणि विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळेल.

या उपक्रमामुळे युवकांना प्रशासनाची कार्यपद्धती, शासनाच्या योजना आणि ग्रामीण विकास प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळेल, तसेच जिल्हा परिषदेला नव्या कल्पना आणि कुशल मनुष्यबळाचा लाभ होईल. यासोबतच निवड झालेल्या फेलोंना Symbiosis International University मार्फत "Certificate in Public Policy and Transformative Leadership" हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येईल. त्यामुळे फेलोंच्या नेतृत्व क्षमता, सार्वजनिक धोरणांबाबतचे ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांचा अधिक विकास होण्यास मदत होईल. अशा प्रकारे, हा उपक्रम युवा शक्ती आणि प्रशासन यांच्यातील प्रभावी दुवा निर्माण करून पुणे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देईल.

**पात्रता निकष:**

1. उमेदवार हा पुणे जिल्ह्याचा (ग्रामीण भागातील) रहिवासी असावा.
2. 25 लाभार्थी विद्यार्थी हे समाज कल्याण विभागा मार्फत निवडले जातील जे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती(SC, ST, VJNT) प्रवर्गातील असतील.
3. तसेच 25 विद्यार्थी हे सामान्य प्रशासन विभागा मार्फत निवडले जातील हे लाभार्थी खुल्या प्रवर्गातील, इतर मागासवर्ग (OPEN, OBC) प्रवर्गातील असतील.
4. B.E/B. TECH/, M.E/M. TECH, B. ARCH/M. ARCH, B. Design, M. Design, MBA, M.A (Social Work, Development studies or specialization in Women & Child, Education, Agriculture, Public Health or similar degree) (किमान 60 %) गुण आवश्यक. याशिवाय प्राधान्याच्या शैक्षणिक संस्था : आयआयटी, आयआयएम, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये,एनआयटी, जेबीआयएमएम, व्हीजेटीआय, व्हीएनआयटी, व्हिआयटी, पीआयसीटी, टाटा

इंस्टीट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, अझीम प्रेमजी यूनिवर्सिटी व इतर या सारख्या नामांकित शिक्षण संस्थामधील विद्यार्थ्यायासाठी.

5. दिनांक 31 डिसेंबर 2025 रोजी लाभार्थ्याचे वय हे 21 ते 27 वर्षे दरम्यान असावे.
6. लाभार्थी हा संगणक साक्षर असावा. उत्तमरीत्या संगणक हाताळणाऱ्या आणि संगणकाचा कोणत्याही कार्यालयीन कामामध्ये चपखलपणे वापर करण्याची हातोटी असलेल्या विद्यार्थ्याचा निवड करतेवेळी प्राधान्याने विचार केला जाईल.
7. मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक, इग्रंजी भाषेचे पुरेस ज्ञान आवश्यक आहे.

**शैक्षणिक कार्यक्रम**

पुणे जिल्हा परिषद आणि **Symbiosis International University)** यांच्या संयुक्त विद्यमाने **"Certificate Course in Public Policy, Governance and Transformative Leadership 2026-27"** हा विशेष **प्रमाणपत्र कोर्स जिल्हा परिषद कौशल्य विकास योजने** अंतर्गत पुरविण्यात येणार आहे.

या कोर्समुळे फेलोजना प्रशासन, सुशासन, ग्रामीण विकास आणि नेतृत्व याबाबत प्रत्यक्ष अनुभवासह प्रशिक्षण मिळणार आहे. तसेच जिल्हा परिषदेला प्रशिक्षित आणि सक्षम युवा मनुष्यबळ मिळून विविध योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख पद्धतीने करण्यास मदत होणार आहे.

**फेलोंसाठी अटी व नियम (Certificate in Public Policy, Governance and Transformative Leadership, 2026-27)**

1. **अनिवार्य सहभाग**
   सर्व फेलोंसाठी पब्लिक पॉलिसी सर्टिफिकेशन कोर्समध्ये सहभाग घेणे बंधनकारक राहील.
2. **उपस्थितीची अट**
   किमान 75% उपस्थिती राखणे आवश्यक असेल. आवश्यक उपस्थिती पूर्ण न केल्यास कोर्स अपूर्ण समजला जाईल.
3. **कोर्स कालावधी व रचना**
   कोर्सचा कालावधी, क्रेडिट्स व अभ्यासक्रम **Symbiosis International (Deemed University)** या संस्थेद्वारे जिल्हा परिषदेच्या सल्ल्याने निश्चित केला जाईल.
4. **कॅम्पस ट्रेनिंग**
   कोर्समध्ये किमान 3 आठवड्यांचे ऑन-कॅम्पस प्रशिक्षण (residential/ non-residential) अनिवार्य राहील.
5. **असाइनमेंट व मूल्यांकन**
   सर्व असाइनमेंट्स, प्रोजेक्ट्स व केस स्टडी वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. संस्थेच्या मूल्यांकन पद्धतीनुसार (tests/presentations) किमान पात्रता गुण मिळवणे आवश्यक असेल.
6. **फील्ड ॲप्लिकेशन**
   शिकलेल्या संकल्पनांचा वापर प्रत्यक्ष जिल्हा परिषद/स्थानिक प्रशासनातील कामात करणे अपेक्षित राहील. यासाठी स्वतंत्र प्रोजेक्ट/रिपोर्ट सादर करावा लागेल.
7. **शिस्त व आचारसंहिता**
   प्रशिक्षणादरम्यान संस्थेचे व जिल्हा परिषदेचे सर्व नियम, आचारसंहिता व शिस्त पाळणे बंधनकारक राहील.
8. **प्रमाणपत्र (Certification)**
   सर्व अटी पूर्ण केल्यानंतरच संबंधित संस्थेकडून प्रमाणपत्र देण्यात येईल.

9. **बांधिलकी (Commitment Clause)**
   कोर्स पूर्ण करणे हा योजनेचा अविभाज्य भाग असेल. कोर्स अपूर्ण ठेवणे किंवा मधेच सोडणे हे योजनेच्या अटींचे उल्लंघन समजले जाईल.

**निवड प्रक्रिया खालील प्रमाणे असेल**

| | |
|---|---|
| ऑनलाइन ॲप्लिकेशन प्रक्रिया | 5 जून ते 22 जून 2026 |
| ऑनलाइन परीक्षा | 27 जून, 30 ऑनलाइन परीक्षेचा निकाल |
| कागदपत्र पडताळणी आणि मुलाखत | जुलैच्या पहिल्या आठवड्यात |
| अंतिम निवड | जुलैच्या शेवटच्या आठवड्यात |
| ट्रेनिंग | 1-10 ऑगस्ट |
| जॉयनिंग | 15 ऑगस्ट |

**निवड प्रक्रिया दोन टप्प्यांमध्ये राबविली जाईल. निवड प्रक्रियेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:**

**टप्पा 1**

भाग 1 : ऑनलाईन परीक्षा

भाग 2 : सर्वाधिक गुणांच्या आधारे टप्पा 2 साठी १०० उमेदवार शॉर्टलीस्ट करणे

**टप्पा 2**

भाग १: मुलाखत (शॉर्टलीस्ट केलेल्या उमेदवारांसाठी लागू)

भाग २ : अंतिम निवड केलेल्या उमेदवारांची यादी जाहीर करणे

**ऑनलाईन परीक्षेचे स्वरुप :** बहुविविध पर्याय असलेले वस्तुनिष्ठ स्वरुपाचे प्रश्न

**माध्यम:** परीक्षेचे माध्यम इंग्रजी असेल व जेथे व्यवहार्य असेल तेथे प्रश्न व पर्यायी उत्तराचे मराठीत भाषांतर पुरविले जाईल.

**एकूण गुण १००. प्रत्येक प्रश्नास 1गुण**

**कालावधी : ६०मिनिटे**

**ऑनलाइन परीक्षेचे स्वरूप**

| Sr. no. | Subject | No. of Qs | Details |
|---|---|---|---|
| 1 | General Knowledge | 20 | Current affairs, social and economic issues with respect to India and Maharashtra |
| 2 | Reasoning | 20 | Deductive reasoning, inductive reasoning, cause and effect reasoning |
| 3 | English Language | 05 | Grammar and Composition |
| 4 | Marathi Language | 05 | Grammar and Composition |
| 5 | Information Technology | 05 | Application Based Word Processing, Spreadsheets, Presentations, AI |
| 6 | Quantitative Aptitude | 10 | Data interpretation, arithmetic, algebra, basic geometry |
| 7 | Competencies | 20 | Critical Thinking, problem solving, decision making |
| 8 | Qualities | 15 | Personal qualities to be ideally possessed by policy and governance professional, including but not limited to compassion, adaptability, initiative, etc. |

**टप्पा 2 साठी उमेदवार शॉर्टलीस्ट करणे**

एकूण गुण 100 पैकी असतील.

ऑनलाइन परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधून मुलाखतीसाठी निवड केली जाईल, त्यापैकी 50 उमेदवार हे समाज कल्याण विभागामार्फत निवडले जातील तसेच 50 उमेदवार ही सामान्य प्रशासन विभागामार्फत निवडले जातील शॉर्टलिस्ट केलेल्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

अंतिम निवडीसाठी ऑनलाइन परीक्षेचे गुण 100 पैकी 70 गुणांमध्ये आणि मुलाखतीचे गुण 30 गुणांमध्ये रूपांतरित करण्यात येतील. या एकत्रित गुणांच्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार करून निवड झालेल्या 50 उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

**अंतिम निवड**

**उमेदवारांच्या अंतिम निवडीकरीता खालीलप्रमाणे गुणांकन पद्धत वापरली जाईल.**

ऑनलाईन चाचणीचे 100 पैकी गुण 70 पैकी गुणांमध्ये रुपांतरीत करुन + मुलाखत 30 गुण निवड झालेल्या प्रवर्ग निहाय 50 उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात येईल

**कृपया नोंद घ्या**

**सदर योजनेकरिता भरती प्रकिया ही एम के सी एल मार्फत राबविण्यात येत असल्यामुळे ऑनलाईन परीक्षाबाबत जिल्हा परिषद कडे कोणतीही स्वरुपाचा पत्र व्यवहार करणेत येवू नये.**

१. मुलाखतीस येणाऱ्या उमेदवारांस आपल्यासोबत सर्व गुणपत्रिका, अनुभवाची प्रमाणपत्रे. ओळखपत्र व इतर संबंधित कागदपत्रांची मूळ प्रत व नक्कल आणणे आवश्यक आहे...

२. मुलाखतीस पात्र उमेदवारांना मुलाखतीचा दिवस व वेळ इमेल द्वारे कळविण्यात येईल.

३. मुलाखतीस हजर राहण्यासाठी उमेदवारांना प्रवासखर्च किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही.

**नियम व अटी:**

1) पुणे जिल्हा परिषद 2026-27 वर्षासाठी जिल्हा परिषदेची फेलोशिप हा उपक्रम राबवत आहे, त्या साठी 50 फेलोची निवड करण्यात येणार आहे. या फेलोशिप साठी पात्र लाभार्थी विद्यार्थी हा पुणे जिल्ह्याचा (ग्रामीण भागातील) रहिवासी असावा. योजनेचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा व १३ तालुका असे असेल. निवड करण्यात आलेल्या फेलोशिप विद्यार्थीची ग्रामीण भागात राहणेची तयारी असणे आवश्यक असून 30 विद्यार्थी तालुका स्तरावर व 20 विद्यार्थी मुख्यालय स्तरावर नेमणेत येतील. सदर संख्या बदलाबाबत सर्वस्वी अधिकारी राखून ठेवणेत आलेला आहे.

2) 25 लाभार्थी विद्यार्थी हे समाज कल्याण विभागा मार्फत निवडले जातील जे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती(SC, ST, VJNT) प्रवर्गातील असतील.

3) तसेच 25 विद्यार्थी हे सामान्य प्रशासन विभागा मार्फत निवडले जातील हे लाभार्थी खुल्या प्रवर्गातील, इतर मागासवर्ग (OPEN, OBC) प्रवर्गातील असतील.

4) निवड प्रक्रियेमध्ये कुठल्याही प्रवर्गासाठी आरक्षण असणार नाही.

5) B.E/B. TECH/ M.E/M. TECH, B. ARCH/M. ARCH, B. Design/ M. Design or Similar, MBA, M.A (Social Work or Development studies or specialization in Women & Child, Education, Agriculture, Public Health or similar degree) किमान 60 % गुण आवश्यक. याशिवाय प्राधान्याच्या शैक्षणिक संस्था : आयआयटी, आयआयएम, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये,एनआयटी, जेबीआयएमएम, व्हीजेटीआय, व्हीएनआयटी, व्हिआयटी, पीआयसीटी, टाटा इंस्टीट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, अझीम प्रेमजी यूनिवर्सिटी व इतर या सारख्या नामांकित शिक्षण संस्थामधील विद्यार्थ्यायासाठी.

6) दिनांक 31 डिसेंबर 2025 रोजी लाभार्थ्याचे वय हे 21 ते 27 वर्षे दरम्यान असावे.

7) लाभार्थी हा संगणक साक्षर असावा. उत्तमरीत्या संगणक हाताळणाऱ्या आणि संगणकाचा कोणत्याही कार्यालयीन कामामध्ये चपखलपणे वापर करण्याची हातोटी असलेल्या विद्यार्थ्याचा निवड करतेवेळी प्राधान्याने विचार केला जाईल.

8) मराठी भाषा लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक, इग्रंजी भाषेचे पुरेस ज्ञान आवश्यक आहे.

9) विद्यार्थ्याने केलेल्या कामापोटी रु.25,000/- इतका विद्यावेतन 11 महिन्याकरिता देणेत येईल.

10) दिलेले काम अथवा त्यांनी केलेल्या कामाचे मुल्यांकन करुन त्यांचा कालावधी संपुष्टात आणणे हा निर्णय सर्वस्वी पणे जिल्हा परिषदकडे राहिल.

11) कामाच्या संदर्भात पुणे जिल्हा परिषदेने वेळोवेळी घालून दिलेल्या नियम आणि अटींचे पालन करण्याची जबाबदारी ही संबंधित विद्यार्थ्याची असेल. सदर नियमांचे पालन न झाल्यास अथवा समाधानकारक काम नसल्यास अशा विद्यार्थ्याची कार्यालयीन सेवा कधीही थांबविण्याचा अधिकार जिल्हा परिषदेला असेल.

12) योजनेतून रुजू होतेवेळी विद्यार्थी उमेदवाराने, पुणे जिल्हा परिषदेने दिलेले निवडपत्र काळजीपूर्वक वाचावे.त्यातील दिलेले नियम आणि अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. निवड केलेल्या लाभार्थ्याने फेलोशिप अर्धवट सोडून जाऊ नये म्हणून निवड झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत बंधपत्र करून देणे आवश्यक आहे.

13) सदर योजनेअंतर्गत निवड केलेल्या लाभार्थ्यास कोणत्याही नियमित पदावर हक्क सांगता येणार नाही. तसेच सदर निवडीच्या आदेशाने त्यांना कोणत्याही न्यायालयात वा प्राधिकरणाकडे जिल्हा परिषदेच्या सेवेत नियमित करण्यास्तव दाद मागता येणार नाही.

14) निवड संख्येमध्ये वेळोवेळी बदल करण्याचे सर्वाधिकार हे पुणे जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने राखून ठेवलेले आहेत.

15) कौशल्य विकास कार्यक्रम हा पूर्ण वेळ कार्यक्रम असून कार्यकाळात जिल्हा परिषदेने मान्यता असलेल्या अभ्यासक्रमाशिवाय फेलोंना इतर नोकरी,खाजगी प्रॅक्टीस, असाईनमेंट किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम स्विकारता येणार नाही.

16) या ११ महिन्यांच्या कार्यक्रमात एकदाच सहभागी होता येते व मुदतवाढीची किंवा पुनर्नियुक्तीची तरतूद नाही.

17) ज्या विभागासोबत फेलो काम करेल त्या विभागाच्या कामाच्या वेळा फेलोसही लागू राहतील.

18) फेलोंना कामाच्या गरजेनुसार अधिक तास काम करणे किंवा प्रवास करणे आवश्यक राहील.

19) फेलोंच्या मुलाखतीच्यावेळी शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय तसेच ओळखपत्र आदी संदर्भातील कागदपत्रांची पडताळणी केली जाईल. फेलोंनी रूजू होताना मान्यताप्राप्त MBBS डॉक्टरकडून वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे. नियुक्तीनंतर फेलोंची पोलीस पडताळणी केली जाईल.

20) फेलोशिपच्या कालावधीत जेथे नेमणूक केलेली आहे त्या भागामध्ये फेलोस वास्तव्य करावे लागेल.

21) फेलोंच्या राहण्याची व्यवस्था केली जाणार नाही.

22) नियुक्तीचे पत्र (ऑफर लेटर) मिळाल्यानंतर रुजू होण्याच्या दिवशी निर्देशित ठिकाणी वेळेत हजर राहण्याचे बंधन फेलोंवर असेल. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द केली जाईल.

23) फेलोनि प्रत्येक महिन्याचा ५ तारखे अगोदर अहवाल आणि उपस्थिती पत्र त्यांच्या संबंधित विभागाकडे, देणे बंधनकारक असेल.

24) फेलोणा फेलोशिपच्या कालावधीत 11 दिवसाची किरकोळ रजा घेता येईल, पण त्यासाठी संबंधित विभागाची परवानगी घेणे आवश्यक राहील.

25) फेलोशिपच्या कालावधीत फेलो कुठल्याही राजकीय चळवळीत भाग घेऊ शकणार नाही.

26) सदर योजना ही कोणत्याही विद्यार्थ्यास पुणे जिल्हा परिषदेमध्ये कायमस्वरूपी अथवा कंत्राटी स्वरूपाच्या नोकरीची ऑफर / आश्वासन देत नाही.

**गजानन पाटील, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**